## मे.राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरण, नवी दिल्ली येथे अल्मित्रा एच पटेल यांनी भारत सरकार व इतर विरुध्द दाखल केलेल्या अर्ज क्र.१९९/२०१४ मध्ये जारी केलेल्या दिनांक २२/१२/२०१६ रोजीच्या आदेशांन्वये दिलेले निर्देश

घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ च्या नियमांची प्रभावी आणि जलद अमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी, तसेच या नियमातील पोकळी भरून काढण्यासाठी सर्वसमावेश निर्देश देणे या न्यायाधिकरणासाठी आवश्यक आहे. त्यामुळे,पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्यासाठी आम्ही पुढील निर्देश देतो:

1. प्रत्येक राज्याने आणि केंद्रशासित प्रदेशाने, सर्व बाबतीत आणि आणि कोणत्याही अधिक विलंबाशिवाय, घनकचरा व्यवस्थापन नियम, 2016 लागू करावेत आणि त्यांची अंमलबजावणी करावी.
2. सर्व राज्यांनी आणि केंद्रशासित प्रदेशांनी, 2016 च्या नियमांच्या आणि या निकालातील निर्देशांच्या संदर्भात, हा निकाल जाहिर होण्यापासून चार आठवड्यांच्या आत, कृती योजना तयार करावी.

   कृती योजना संपूर्ण राज्यातील कचऱ्याचे व्यवस्थापन आणि विल्हेवाट याशी संबंधित असेल.ही कार्यवाही समयबद्ध पद्धतीने करण्याची आवश्यकता आहे.कचऱ्यावरील प्रक्रिया आणि विल्हेवाट यासाठी प्रकल्पांची स्थापना आणि कार्यप्रणाली, बांधाव्या लागणाऱ्या लँडफिल स्थळांची निवड आणि वैशिष्ट्ये, काटेकोरपणे 2016 च्या नियमांच्या अनुसार तयार करावी आणि ठेवावी लागतील.
3. 2016 च्या नियमातील नियम6(b), 15मध्ये विनिर्दिष्ट सहा महिन्यांचा कालावधी अगोदरच व्यपगत झाला आहे. राज्य सरकारांनी, निर्धारित कालावधीमध्ये त्यासंदर्भात, कार्यवाही केली नाही. शेवटची संधी म्हणून, आम्ही निर्देश देतो की, सहा महिन्यांचा कालावधी 1 जानेवारी, 2017 पासून गृहित धरण्यात यावा. या तरतूदींचे अनुपालन करण्यासाठी कोणत्याही राज्याला यापेक्षा अधिक मुदतवाढ दिली जाणार नाही.

तयार योजनाआणि समित्यांनी दिलेले निर्देश यांच्या अनुपालनासाठी नियम 11(a), 11(f), 15(e) आणि 22 मध्ये विनिर्दिष्ट एक वर्षाचा कालावधी, त्यामुळे, 1 जुलै 2017 पासून सुरू होईल.यासाठीदेखील, कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही.

वर नमूद केलेल्या वैधानिक बंधनांचे अनुपालन न करणारे कोणतेही राज्य किंवा केंद्रशासित प्रदेश,पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, 1986 च्या भाग 15 नुसार कारवाईसपात्र ठरेल.त्याशिवाय ते राज्य किंवा केंद्रशासित प्रदेश, न्यायाधिकरणाने लादलेली पर्यावरण नुकसानभरपाई देण्यास पात्र ठरेल. तसेच, राज्य सरकारमधील/नागरी स्थानिक संस्थेमधील सर्वात वरिष्ठ शासकिय अधिकारी नियमांच्या आणि या न्यायाधिकरणाने पारित केलेल्या आदेशांच्या उल्लंघनासाठी व्यक्तिश: कारवाईस पात्र ठरेल.

4. केंद्र सरकारने, राज्य सरकारने, स्थानिक अधिकाऱ्यांनी आणि नागरिकांनी 2016 च्या नियमांमध्ये योजलेली आपापाली दायित्वे/कर्तव्ये, कोणत्याही अधिक विलंबाशिवाय किंवा हरकतीशिवाय, पार पाडावीत.
5. सर्व राज्य सरकारे, त्यांचे विभाग आणि स्थानिक अधिकारी यांनी एकमेकांमेकांशी संपूर्ण सहकार्याने आणि समन्वयाने काम करावे आणि राज्यामध्ये निर्माण झालेल्या घनकचऱ्याचेव्यवस्थापन, त्यावरील प्रक्रिया आणि त्याची विल्हेवाट,काटेकोरपणे, 2016 च्या नियमानुसार केली जाईल हे सुनिश्चित करावे.
6. कचऱ्यावरील प्रक्रियेसाठी, जेथेजेथे कचऱ्यापासून ऊर्जानिर्मिती प्रकल्प उभारण्यात आला आहे तेथे,भस्मीकरणापूर्वी, कचऱ्याच्या परिमाणाच्या प्रमाणात अनिवार्य आणि योग्य विलगीकरण करण्याचे सुनिश्चित करावे.
7. प्रकल्पांभोवती आणि लॅंडफिल स्थळांभोवती, ते भौगोलोकदृष्ट्या एकत्र असोत की अलग असोत,,उभयरोधी क्षेत्र (बफर झोन) सोडणे अनिवार्य असेल.जेथे जागेची कमतरता आहे तेथे उभयरोधी क्षेत्र (बफर झोन) 500 मीटर असण्याची गरज नाही. प्रकल्प आजुबाजुच्या क्षेत्रापासून हरित पट्ट्याने विलग करणे हा उभयरोधी क्षेत्राचा (बफर झोन) उद्देश आहे जेणेकरून प्रदूषणास प्रतिबंध आणि नियंत्रण होईल, तसेच, प्रकल्पाचे स्थळ बागकामाने

सुशोभित केले जाईल. याचा निर्णय संबंधित अधिकाऱ्यांनी घ्यावा आणि बफर झोनच्या विस्ताराबाबत नियमांमध्ये काहीही सांगितलेले नाही. परंतू, नगर विकास माहितीपुस्तिकेमध्ये त्याबाबत नमूद केले आहे. त्यामुळे, आम्ही असे मानतो की, ही तरतूद बंधनकारक नसून, मार्गदर्शक आहे.

आम्ही स्पष्ट करतो की, उभयरोधी क्षेत्र (बफर झोन) आणि हरित पट्टा आवश्यक आहेत आणि त्यांचा विस्तार किती असावा हे त्यात्या प्रकरणानुसार ठरवावे.

8. आम्ही निर्देश देतो की, नियम 5 अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या समित्यांनी वर्षातून एकदा बैठक न घेता किमान तिन महिन्यातून एकदा बैठक घ्यावी. बैठकीचा वृत्तात सार्वजनिक करावा. बैठकीनंतर, वृत्तांताच्या आधारे संबंधित राज्ये, स्थानिक संस्था, विभाग आणि प्रकल्प प्रस्तावक यांना तात्काळ निर्देश जारी करावेत.

9. राज्य सरकार आणि स्थानिक अधिकाऱ्यांनी, सर्व संबंधितांना, त्यांच्या अधिकारक्षेत्रातील ऊर्जा निर्मिती आणि सिमेंट प्रकल्पांसाठी, असा प्रकल्प सुविधाकेंद्राच्या 100 किमी त्रिज्येमध्ये स्थित असेल तेथे, इंधन म्हणून आरडीफ खरेदी करणे बंधनकारक करणारे निर्देश जारी करावेत.

   म्हणजेच, राज्यांना, स्थानिक संस्थांना आरडीएफच्या खपासाठी बाजारपेठ निर्माण करणेबंधनकरक आहे. दुसरे कारण म्हणजे, कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती प्रकल्पांमध्ये देखील, कचरा-आरडीएफ-ऊर्जा पर्याय पसंत केला जातो.

10. कचऱ्यापासून ऊर्जानिर्मिती प्रकल्पांमध्ये थेट भस्मीकरणाद्वारे संपूर्ण विलगीकरण बंधनकारक असेल आणि कराराच्या अटी आणि शर्थींमध्ये तसे नमूद करावे.

11. सवलतधारकास/सुविधाकेंद्र चालकास देय असलेले टिपिंग (कचरा उतरवणे) शुल्क, सवलतधारकास/सुविधाकेंद्र चालकास पुरविण्यात आलेल्या कचऱ्याच्या परिणामाच्या प्रमाणात असेलच तसेच, ते प्रकल्पाची कार्यक्षमता आणि नियमित कार्य याच्यादेखील प्रमाणात असेल.जेथे टिपिंग (कचरा उतरवणे) शूल्क कचऱ्याच्या भाराशी संबंधित असेल तेथे संबंधित विभागाच्या आणि स्थानिक प्राधिकरणाच्या ऑनलाईन प्रणालीशीयोग्य संगणीकृत वजन यंत्र जोडणे बंधनकारक आहे.

12. जेथे सवलतधारकाने / सुविधाकेंद्र चालकाने कचरा संकलित करावयाचा आहे तेथे, निष्क्रिय आणि सी अँड डी कचरा स्त्रोतस्थळी/संकलन स्थळी विलग करून नंतर त्याची नियमानुसार निर्धारित स्थळी वाहतूक करणे सवलतधारकावर / सुविधाकेंद्र चालकावर बंधनकारक आहे.

13. आदेश जाहिर झाल्यापासून सहा महिन्यांचे आत लँडफिल स्थळांचे जैव-स्थिरिकरण केले जाईल.वाष्प (विडरो) नियमित क्रमाने फिरवले पाहिजेत. लँडफिल स्थळी मिथेनचा निचरा आणि निर्मितीस प्रतिबंध करण्यासाठी सर्व प्रयत्न केले पाहिजेत.स्थिरिकरण झालेल्या कचऱ्याचे कंपोस्ट करावे आणि त्याचा सेंद्रिय खत म्हणून वापर करावा.

14. लँडफिलचा वापर शक्यतो केवळ निष्क्रिय कचरा आणि नको असलेले पदार्थ टाकण्यासाठीच केला पाहिजे. परंतू, अधिकाऱ्यांवर लँडफिलचा चांगल्या आणि वैध कारणांसाठी वापर करण्याची सक्ती करण्यात आली तर, अशा लँडफिल स्थळी टाकण्यात येणारा कचरा (निष्क्रिय वगळून) विलग करावा आणि तो खंड-12 अनुसार हाताळावा.

15. बिगर-जैव अपघटनीय कचरा आणि बिगर-पुनर्चक्रीकरणयोग्य प्लास्टिक लँडफिल स्थळापासून विलग केले पाहिजे आणि त्याचा वापर, सपूर्ण देशभरातील सर्व रस्ते प्रकल्पांमध्ये, रस्ते आणि तटबंदीच्या बांधकामासाठी करावा. सवलतधारकास/ सुविधाकेंद्राच्या चालकास काम बहाल करण्याच्या करारमध्ये तशी खास अट असली पाहिजे.

16. राज्य सरकार, स्थानिक प्राधिकरणे,संबंधितराज्य सरकारांची प्रदूषण नियंत्रण मंडळे, केंद्रशासित प्रदेशांची प्रदूषण नियंत्रण मंडळे, आणि संबंधित विभागांनी,विस्तारित निर्माता जबाबदारी पार पाडत असताना, राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या प्रत्येक वसाहतीमध्ये योग्य प्रमाणात केंद्र उघडण्याचे किंवा उघडण्यास कारणीभूत होण्याचेसुनिश्चित करतील; ही केंद्रे घरगुती धोकादायक कचरा जसे, फ्लुरोसंट ट्युब, बल्ब, बॅटरी, इलेक्ट्रॉनिक वस्तु, सिरिंज, मुदतबाह्य औषधी आणि तत्सम वस्तु गोळा करतील किंवा वस्तीमधील रहिवाशांना तो केंद्रामध्ये जमा करण्यास सांगतील.केंद्रांनी अशाप्रकारे संकलित केलेला धोकादायक कचरा शक्य असेल तेव्हा पुनश्चक्रिकरणासाठी पाठवला पाहिजे आणित्याचा उरलेल्या भागाचीधोकादायक कचरा विल्हेवाट केंद्राकडे वाहतूक केली पाहिजे.

17. आम्ही MoEF& CC, आणि राज्य सरकारांना निर्देश देतो की, लघु आयुष्यमर्यादा पीव्हीसी आणि क्लोरिनयुक्त प्लास्टिकयांच्यावर बंदी आणण्यासंदर्भात योग्य निर्देशांवर विचार करून ते शक्य तितक्या जलद, कोणत्याही परिस्थितीमध्ये, हा निकाल जाहिर झाल्यापासून सहा महिन्यांमध्ये, पारित करावेत.

18. या निकालामध्ये पारित करण्यात आलेले निर्देश आणि आदेश कोणत्याही वर्तमान करारावर परिणाम करणार नाहीत, परंतू, तरीदेखील आम्ही निर्देश देतो की, कचऱ्याचे व्यवस्थापन आणि विल्हेवाट यासंबंधी करारामध्ये पक्षांनी परस्पर संमतीने, त्यांची कामगिरी, हक्क आणि दायित्वे यांची न्यायाधिकरणाच्या निकालाशी आणि 2016 च्या नियमांशी एकवाक्यता आणावी. परंतू, सर्व सवलतधारकांना/ प्रक्रिया सुरू असलेल्या सुविधाकेंद्र चालकांना सुद्धा हा निकाल आणि 2016 चे नियम पूर्णत: आणि सर्वसमावेशकपणे लागू असतील.

19. आम्ही खासकरून निर्देश देतो की, कचरा उघड्या जमिनीवर तसेच, लॅंडफिल स्थळी जाळण्यावर संपूर्ण बंदी असेल. अशा प्रत्येक घटनेसाठी किंवा चुकीसाठीउल्लंघन करणारे, प्रकल्प प्रस्तावक, सवलतधारक, युएलबी, कोणतीहीव्यक्ती किंवा मंडळ, जे कचरा जाळण्याच्या घटनेस जबाबदार असेल, साध्या ज्वलनाच्या बाबतीतरूपये 5000/- (रूपये पाच हजार केवळ) आणि एकत्रित कचरा ज्वलनाच्या बाबतीत रूपये 25000/- (रूपये पंचवीस हजार फक्त) पर्यावरण नुकसानभरपाई देण्यास पात्र असतील.पर्यावरण नुकसान भरपाई कायद्यानुसार सक्षम अधिकाऱ्याद्वारे जमिन महसूलातीलथकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल.

20. सर्व स्थानिक अधिकारी, सवलतधारक, सुविधाकेंद्रांचे संचालक यांना त्यांच्या संकेतस्थळावर प्रकल्पाच्या कामकाजासंबंधीची माहितीतसेच विहित निकषांशी निष्ठा प्रदर्शित करावी लागेल.ही माहिती सार्वजनिक करावी आणि प्रकल्प विनिर्दिष्ट निकषानुसार चालत नसेल तर कोणत्याही व्यक्तीला अधिकाऱ्यांकडे जाण्याचा हक्क असेल.

21. आम्ही सीपीसीबी आणि संबधीत राज्यांना निर्देश देतो की, त्यांनी अशा ज्वलनाच्या घटनांवर देखरेख ठेवून सर्वेक्षण आणि संशोधन करावे आणि कचऱ्याच्या अशा अवैध आणि अनधिकृत

ज्वलनातून कोणती प्रदुषके उत्सर्जित केली आहेत याचा अहवाल न्यायाधिकरणास सादर करावा.

22. कुद्रत संधु विरूद्ध एनसीटी सरकार आणि ओआरएस, ओ.ए. क्र. 2016चे 281 प्रकरणातील न्यायाधिकरणाच्या निकालामधील निर्देश या निकालास आणि त्यामुळे संपूर्ण देशभरातील सर्व संबंधितांना योग्य त्या फेरबदलांसह लागू असतील.

23. संपूर्ण देशभारातील कोणतेही राज्य/केंद्रशासित प्रदेश, स्थानिक प्राधिकरण, सवलतधारक, सुविधाकेंद्र चालक, कोणतेही संबंधित, कचरा निर्माते आणि कोणतीही व्यक्ती जी 2016 च्या नियमांचे उल्लंघन करेल किंवा त्यांचे अनुपालन करणार नाही,पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, 1986 च्या भाग -15 नुसार दंडात्मक कारवाईसाठी पात्र ठरेलतसेच राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण अधिनियम, 2010 च्या भाग 15 आणि 17 नुसार, न्यायाधिकरणाने निश्चित केलेल्या मर्यादेपर्यंत पर्यावरण नुकसानभरपाई भरण्यास पात्र ठरेल.

24. राज्य/केंद्रशासित प्रदेश, सार्वजनिक प्राधिकरणे, सवलतधारक, सुविधाकेंद्र चालक, उपलब्ध सुविधा, कचऱ्यावरील प्रक्रिया, आणि नियमांअंतर्गत आणि या निकालाअंतर्गत सर्वसामान्य जनतेच्या, सार्वजनिक प्राधिकरणांच्या, सवलतधारकांच्या आणि सुविधाकेंद्र चालकांच्याजबाबदाऱ्या याबाबात जनजागृती करण्यासाठी सर्व पावले उचलतील.यासंबंधी जनजागृतीसाठी ते नियमित कालांतराने कार्यक्रमांचे आयोजन करतील. असे कार्यक्रम संबंधित राज्यांच्या/केंद्रशासित प्रदेशांच्या/जिल्ह्यांच्या स्थानिक भाषेत आयोजित करावेत.

25. नियमांमध्ये कचरा टाकण्याच्या स्थळांना (डंपिंग साइट) मान्यता नसून केवळ लॅंडफाईल स्थळांना मान्यता आहे याची सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी आणि त्यासंदर्भात योग्य कार्यवाही करावी अशी आम्ही त्यांच्याकडून अपेक्षा करतो.

26. आम्ही आणखी असे निर्देश देतो की, या निकालामधील निर्देश आणि 2016 च्या नियमांअंतर्गत जबाबदाऱ्या स्थानिक भाषांमध्ये प्रसारित आणि प्रकाशित कराव्यात.

27. राज्यामधील प्रत्येक सल्लागार समिती, या निर्देशांच्या आणि 2016 च्या नियमांच्या योग्य अमलबजावणीसाठी देखरेख समिती म्हणून देखील कार्य करेल.

28. या निकालाची प्रत सर्व मुख सचिव/राज्यांचे/केंद्रशासित प्रदेशांचे सल्लागार यांना न्यायाधिकरणाच्या रजिस्ट्रीद्वारे प्रसारित करावी. सदरील अधिकाऱ्यांना याद्वारे निर्देश देण्यात येतात की या निकालातील निर्देशांचे अनुपालन करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी आणि या निकालाची प्रत मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत न्यायाधिकरणाला अनुपालन अहवाल सादर करावा.

44. वरील वर दिलेल्या निर्देशांसह हा अर्ज आणि इतर संकिर्ण अर्ज, खर्चासंबंधी कोणत्याही आदेशाशिवाय रद्दबातल ठरविण्यात येत आहेत.

स्वातंतर कुमार
अध्यक्ष

यु.डी. साळवी
न्यायिक सदस्य

बिक्रम सिंग सज्वन
तज्ञ सदस्य

अजय देशपांडे
तज्ञ सदस्य

नवी दिल्ली
22 डिसेंबर 2016